*प्रकरण 4*

# *कचरा व्यवस्थापनातील संनियंत्रणाची परिणामकारकता*

## प्रकरण 4

## कचरा व्यवस्थापनातील संनियंत्रणाची परिणामकारकता

***लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, चाचणी-तपासणी केलेल्या 28 नागरी स्थानिक संस्थांमध्ये, 2016-17 ते 2021-22 या कालावधीत भरावभूमी स्थळाच्या 50 मीटरच्या परीघाच्या आत पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी भरावभूमीवर/ क्षेपणभूमीवर केली गेली नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या 32 नागरी स्थानिक संस्थांमध्ये, 2016-17 ते 2021-22 या कालावधीत भरावभूमी/क्षेपणभूमी सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेची चाचणी केली गेली नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांद्वारे नगरपालिका घनकचऱ्याशी संबंधित वार्षिक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर करण्यात 2016-17 ते 2019-20 या कालावधीत 17 टक्क्यांची कमतरता होती. 2020-21 आणि 2021-22 मध्ये कोणतीही कमतरता नव्हती. चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांपैकी कोणीही प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2016 अंतर्गत वार्षिक अहवाल नगर विकास विभागाला सादर केले नव्हते. घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सल्लागार समितीमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व नव्हते.***

घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 हवा व पाण्याच्या गुणवत्तेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून भरावभूमीचे संनियंत्रण निर्धारित करतो. कचऱ्याची निर्मिती, कचऱ्याचे विलगीकरण, कचरा संकलन, कचऱ्यावर प्रक्रिया करणे, क्षेपणभूमी आणि प्रक्रिया सुविधा यांच्या माहितीचा समावेश असलेला वार्षिक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर करणे, हे घनकचरा व्यवस्थापन नियमांमध्ये विहित केले आहे. प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2016 नुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाला वार्षिक अहवाल सादर करणे सुद्धा आवश्यक आहे, ज्यामधे अखत्यारीतील प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनासाठी ठेवलेल्या यंत्रणा, दारोदारी जाऊन प्लॅस्टिक कचरा संकलित करणारी अभिकरणे इत्यादींचा तपशील समाविष्ट असेल.

संपादणूक लेखापरीक्षणाचे चौथे उद्दिष्ट कचरा व्यवस्थापनातील संनियंत्रण यंत्रणा पर्याप्त आणि प्रभावी होती किंवा कसे याचे निर्धारण करणे, हे होते. लेखापरीक्षणात चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये भरावभूमीवर/क्षेपणभूमीवर पाणी व हवेच्या गुणवत्तेचे संनियंत्रण अपर्याप्त होते आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व राज्य शासन यांना वार्षिक अहवाल सादर करण्यात कमतरता आढळून आली.

### 4.1 पाणी व हवेच्या गुणवत्तेचे अपर्याप्त संनियंत्रण

घनकचरा व्यवस्थापन नियमावलीच्या नियम 15 (वाय) नुसार, कच-याचे प्रमाण दररोज पाच मेट्रिक टनांपेक्षा जास्त असल्यास नागरी स्थानिक संस्थांना सॅनिटरी भरावभूमी उभारण्यासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच, घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 च्या अनुसूची I नुसार भूजल दूषित झालेले नाही

याची सुनिश्चिती करण्यासाठी भरावभूमी स्थळाच्या 50 मीटर परीघात वर्षातील विविध ऋतुंमध्ये भूजल गुणवत्तेचे नियतकालिक संनियंत्रण करणे आवश्यक होते.

भरावभूमी स्थळाची व परिसरातील वातावरणातील हवेची गुणवत्ता देखील नियमितपणे संनियंत्रित करणे आवश्यक होते. वातावरणातील हवेच्या गुणवत्तेने केंद्रीय पर्यावरण नियंत्रण मंडळाने औद्योगिक क्षेत्रांसाठी विहित केलेल्या मानकांची पूर्तता करणे आवश्यक होते. पर्यावरणीय मानकांचे संनियंत्रण आणि प्रक्रिया व विल्हेवाटीच्या जागांसाठी घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत निर्दिष्ट केलेल्या अटींच्या पालनासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ जबाबदार होते.

**अ**. सॅनिटरी भरावभूमी असलेल्या 19 नागरी स्थानिक संस्थांपैकी 16 नागरी स्थानिक संस्थांमध्ये दररोज पाच मेट्रिक टनांपेक्षा जास्त कचरा संकलित केला जात होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त माहितीनुसार (ऑक्टोबर 2024) या 16 पैकी 10 नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सॅनिटरी भरावभूमीची अधिकृत परवानगी घेतली नव्हती. तसेच, उर्वरित सहापैकी केवळ दोन नागरी स्थानिक संस्थांकडे वैध मान्यता होती (ऑक्टोबर 2024).

**ब.** चाचणी-तपासणी केलेल्या 45 नागरी स्थानिक संस्थांमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 2016-17 ते 2021-22 दरम्यान केलेल्या पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचण्यांची संख्या **परिशिष्ट 4.1** मध्ये दर्शविली आहे.

लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या:

- चाचणी-तपासणी केलेल्या 45 पैकी 28 नागरी स्थानिक संस्थांमध्ये, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून, 2016-17 ते 2021-22 दरम्यान भरावभूमी स्थळाच्या परिघातील 50 मीटर पर्यंतच्या अंतरामध्ये, पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी केली गेली नव्हती.
- चाचणी-तपासणी केलेल्या 45 पैकी 13[26] नागरी स्थानिक संस्थांमध्ये, 2016-17 ते 2021-22 दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केल्या गेलेल्या पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचण्या या 18 पेक्षा कमी वेळा[27] केल्या गेल्या आणि हे प्रमाण एक (अंमळनेर, गंगापूर, कणकवली, नारखेड आणि वर्धा) ते 12 (छत्रपती संभाजीनगर) यादरम्यान होते.

**क.** नगरपालिका घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 च्या परिच्छेद 3.7.7 नुसार लोकसंख्येच्या आधारावर करण्यात येणाऱ्या हवेच्या गुणवत्ता चाचण्यांची संख्या वर्षातून एक ते सहा वेळा यादरम्यान होती. चाचणी-तपासणी केलेल्या 45 नागरी स्थानिक संस्थांमध्ये 2016-17 ते 2021-22 दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या हवेच्या गुणवत्तेच्या एकूण चाचण्या **परिशिष्ट 4.2** मध्ये दर्शविल्या आहेत.

[26] अमळनेर, बल्लारपूर, छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, जालना, कणकवली, खोपोली, लाखंदूर, नारखेड, नाशिक, पंढरपूर, पुणे आणि वर्धा.

[27] वर्षातील तीन ऋतूंमध्ये कमीत कमी तीन चाचण्या x सहा वर्षे (2016-17 ते 2021-22) विचारात घेऊन म्हणजेच 18 चाचण्या.

याबाबत लेखापरीक्षणात पुढील बाबी निदर्शनास आल्या:

- चाचणी-तपासणी केलेल्या 45 पैकी 32 नागरी स्थानिक संस्थांमध्ये, भरावभूमी स्थळ व भरावभूमी स्थळाच्या परिसरात वातावरणातील हवेच्या गुणवत्तेचे संनियंत्रण 2016-17 ते 2021-22 दरम्यान केले नव्हते; आणि
- चाचणी-तपासणी केलेल्या 45 पैकी 11[28] नागरी स्थानिक संस्थांमध्ये (बृहन्मुंबई महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका वगळता), हवेच्या गुणवत्तेच्या चाचण्या नियमित केल्या जात नव्हत्या.

## 4.2 महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य शासन यांना वार्षिक अहवाल सादर न करणे

घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 आणि प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2016 यांमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व नगर विकास विभाग यांना वार्षिक अहवाल सादर करण्याचे विहित केले आहे. असे वार्षिक अहवाल सादर करण्याची स्थिती खाली चर्चिली आहे.

### 4.2.1 घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत वार्षिक अहवाल

प्रत्येक नागरी स्थानिक संस्थेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला घनकचरा व्यवस्थापन संदर्भात वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक होते. या अहवालामध्ये, इतर गोष्टींबरोबर कचऱ्याची निर्मिती, कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्याचे संकलन, दारोदारी जाऊन संकलन, कचऱ्यावरील प्रक्रिया, क्षेपणभूमी आणि प्रक्रिया सुविधा यांच्या विदांचा समावेश असतो. 2016-17 ते 2019-20 दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला वार्षिक अहवाल सादर न करणाऱ्या चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्था **तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता 4.1: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांनी वार्षिक अहवाल सादर केल्याची स्थिती**

| वर्ष | चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांद्वारे सादर करावयाच्या वार्षिक अहवालांची एकूण संख्या | चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर न केलेल्या वार्षिक अहवालांची संख्या | सादर करण्यातील कमतरता (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| 2016-17 | 45 | 14 | 31 |
| 2017-18 | 45 | 13 | 29 |
| 2018-19 | 45 | 2 | 4 |
| 2019-20 | 45 | 2 | 4 |
| **एकूण** | **180** | **31** | **17** |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वार्षिक अहवाल*

**तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, चाचणी-तपासणी केलेल्या 45 नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला 2016-17 ते 2019-20 दरम्यान सादर

[28] अमळनेर, बल्लारपूर, छत्रपती संभाजीनगर, इचलकरंजी, मुक्ताईनगर, नंदुरबार, नाशिक, नारखेड, निफाड, पंढरपूर आणि वर्धा.

करावयाच्या 180 वार्षिक अहवालांपैकी 31 वार्षिक अहवाल (17 टक्के) सादर केले नव्हते. तथापि, 2020-21 व 2021-22 या कालावधीत सर्व 45 नागरी स्थानिक संस्थांनी वार्षिक अहवाल सादर केले होते.

### 4.2.2 प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियमांतर्गत वार्षिक अहवाल

प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2016 च्या नियम 17(2) नुसार, सर्व नागरी स्थानिक संस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सूचित करून सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रपत्र-V मध्ये वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-V मध्ये अधिकारक्षेत्रातील परिसरातील दारोदारी जाऊन संकलन करणा-या अभिकरणांच्या तपशीलासहित प्लॅस्टिक कच-याच्या व्यवस्थापनासाठी करण्यात आलेल्या यंत्रणांचा सारांश, आवश्यक पायाभूत सुविधांचा तपशील, वर्षभरातील प्लॅस्टिक कच-याचे निर्माण, संकलन, पुनर्वापरासाठी पाठविल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक कच-याचे प्रमाण, आर्थिक अडचणींसहित या नियमांच्या तरतुदींचे पालन करण्यात स्थानिक स्वराज्य संस्थेला येणा-या अडचणी, इत्यादींचा समावेश आहे. चाचणी-तपासणी केलेल्या एकाही नागरी स्थानिक संस्थेने असा वार्षिक अहवाल 2016-17 ते 2021-22 या कालावधीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सूचित करून सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर केला नव्हता.

निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी सांगितले (ऑगस्ट 2022) की, नागरी स्थानिक संस्थांकडून प्राप्त करण्यासाठी सक्रिय पाऊले उचलली जातील.

## 4.3 राज्य स्तरीय सल्लागार समितीची स्थापना

घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 चा नियम 23 मध्ये एप्रिल 2016 मधील अधिसूचनेच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत 22 सभासदांचे[29] राज्यस्तरीय सल्लागार मंडळ स्थापन करण्याची तरतूद आहे. राज्यस्तरीय सल्लागार मंडळाने नियमांच्या अंमलबजावणीसंबंधीच्या बाबी, घनकचरा व्यवस्थापनावरील राज्याचे धोरण व रणनीती यांचा आढावा घेऊन घनकचरा व्यवस्थापन नियमांची त्वरीत आणि योग्य अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक उपाय करण्यासाठी राज्य शासनाला सल्ला देणे आवश्यक होते.

---

29 सचिव, नगर विकास विभाग, ग्रामीण विकास विभागाचा एक प्रतिनिधी, महसूल विभागाचा एक प्रतिनिधी, भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाचा एक प्रतिनिधी, भारत सरकारच्या नगर विकास विभागाचा एक प्रतिनिधी, भारत सरकारच्या ग्रामीण विकास विभागाचा एक प्रतिनिधी, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान/राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान मधून एक प्रतिनिधी, राज्याचे मुख्य नगर रचनाकार, स्थानिक संस्थांचे तीन प्रतिनिधी, शहर जनगणना किंवा नागरी समूह (ॲग्लोमरेशन) कडील दोन प्रतिनिधी, नामांकित अशासकीय संस्थांचा एक प्रतिनिधी, केंद्र किंवा राज्य स्तरीय उद्योगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेकडील एक प्रतिनिधी, जल पुनर्प्रक्रिया उद्योगातील एक प्रतिनिधी, दोन विषयतज्ज्ञ, कृषी व कामगार विभाग, राज्य शासन यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 11 महिन्याच्या विलंबानंतर सप्टेंबर 2017 मध्ये राज्य शासनाने 10 सभासदांसह[30] राज्यस्तरीय सल्लागार मंडळाची स्थापना केली. तसेच, स्थापन केलेल्या राज्यस्तरीय सल्लागार मंडळामध्ये खालील सदस्य (i) राज्याचे मुख्य नगर रचनाकार, (ii) स्थानिक संस्थांचे तीन प्रतिनिधी, (iii) शहर जनगणना किंवा नागरी समूहाचे (ॲग्लोमरेशन) दोन प्रतिनिधी, (iv) केंद्र किंवा राज्यस्तरीय उद्योगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळाचा एक प्रतिनिधी, (v) दोन विषयतज्ञ, (vi) राज्य शासनाच्या कृषी व कामगार विभागांचे प्रत्येकी एक प्रतिनिधी आणि नामांकित अशासकीय संस्थेचा एक प्रतिनिधी नव्हते.

निर्गमन बैठकीत, प्रधान सचिवांनी सांगितले (ऑगस्ट 2022) की, संबंधित क्षेत्रांमधून निष्णात व्यक्तींचा, राज्य स्तरीय सल्लागार मंडळामध्ये समावेश करण्यात येईल.

***शिफारस 11: शासनाने सुनिश्चित करावे की घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सल्लागार समितीमध्ये नियमामध्ये प्रस्तावित केल्यानुसार पर्याप्त प्रतिनिधित्व केलेले आहे.***

(**सी.एम. साने**)

मुंबई, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I

दिनांक 21 जानेवारी 2025 महाराष्ट्र, मुंबई

प्रतिस्वाक्षरित

(**के. संजय मूर्ती**)

नवी दिल्ली, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

दिनांक 28 जानेवारी 2025

[30] सभापती म्हणून नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, सदस्य सचिव म्हणून संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, संयुक्त सचिवाच्या श्रेणीपेक्षा कनिष्ठ नसलेला ग्रामीण विकास विभागाचा एक सदस्य, महसूल व वन विभागाचे प्रतिनिधी, भारत सरकारचे पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाचे प्रतिनिधी, भारत सरकारच्या नगर विकास विभागाचे प्रतिनिधी, भारत सरकारच्या ग्रामीण विकास विभागाचे प्रतिनिधी, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान/राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थानाचे प्रतिनिधी.